# इचलकरंजी महानगरपालिका
## जि.कोल्हापूर

कार्यालय संपर्क क्रं.०२३०-२४२१४५१ ते ५३
Email : ichalkaranjinp@gmail

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**गणेश उत्सव २०२३ साजरा करणेबाबत मूर्तीकार /मूर्तीसाठवणूकदार यांना मार्गदर्शक सुचना**

इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना सदर निवेदनाद्वारे कळविणेत येते की, केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळ,दिल्ली यांचेकडील दि.१२/०५/२०२० रोजीच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन मूर्तीची निर्मिती ,आयात,साठा बंदी बाबतच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याच्या सुचना दिल्या असुन नदीचे प्रदूषण व नुकसान टाळण्याकरिता केंद्र सरकारने प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) च्या मुर्तीवर बंदी जाहिर केली आहे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन मुर्ती निर्मिती,आयात साठा बंदीबाबत महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सदर सुधारीत मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचित केले आहे.
- मा.उच्च न्यायालय यांनी देखील हि बंदी कायम केली आहे.
- प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन मुर्ती निर्मिती.आयात साठा करणारे व्यापारी इत्यादी व संबंधित अधिकाऱ्यांमध्ये जागरुकता असणे आवश्यक आहे.
- यासाठी मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी दि.०१/०१/२०२१ पर्यंत केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुदतवाढ दिली होती.
- मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी दि.०१/०१/२०२१ पासून बंधनकारक केली असुन त्याद्वारे मार्गदर्शक सुचना नव्याने प्राप्त झालेल्या आहेत.
- केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त मार्गदर्शक सुचना मनपाच्या संकेतस्थळावर माहितीस्तव उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.
- शाडू/पर्यावरण पूर साहित्याने मुर्ती घडविण्याचे /साठविण्याचे वेळोवेळी देण्यात आलेले निर्देश सन २०२३ च्या नवरात्रोत्सवादरम्यान देखील लागू राहतील. व त्यासाठी स्वतंत्र निर्देश /परिपत्रक /जाहिरात देण्यात येणार नाही.
- इचलकरंजी महानगनपालिका कार्यक्षेत्रातील श्री गणेशोत्सवाकरिता अथवा अन्य विविध सण, उत्सव, कार्यक्रम इत्यादी अनुषंगाने मुर्तीकारांकडून मुर्ती निर्मिती,आयात, साठा, विक्री इत्यादी कार्यवाही केली जाते. त्या अनुषंगाने शहरातील सर्व मुर्ती विक्रेते, कारखाने, कारागीर, साठवणूक करणारे व्यापारी, दुकानदार गाळेधारक इत्यादींना सुचित करणेत येते की, त्यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन मुर्ती निर्मिती ,आयात साठा बंदीबाबतच्या मार्गदर्शक सुचनांबाबत काटेकोरपणे पालन करावे.
- तसेच,नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन तयार होणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या मूर्ती नदीपात्रात या नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतात विसर्जित करु नये.
- शाडू/पर्यावरणपूरक साहित्याने मूर्ती घडविणाऱ्या मूर्तीकारांनी त्यांच्या मंडपाबाहेर, 'येथे पर्यावरणपूरक साहित्याने घडविलेल्या मूर्ती उपलब्ध आहेत' अशा आशयाचा ३X५ एवढया आकारमानाचा फलक लावणे आवश्यक आहे.
- कमी उंचीच्या सार्वजनिक श्री गणेश मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात प्राधान्य देण्यात यावे.

सदर मार्गदर्शक सूचनांचे सर्व नागरिक/भाविक /मूर्तीकार/गणेश मूर्ती साठवणूकदार यांनी पालन करुन इचलकरंजी महानगरपालिकेस सहकार्य करावे.

दिनांक :- ०५ /०९ /२०२३

(ओमप्रकाश दिवटे )
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका